**नियमित दिवाणी दावा क.२४५/२०२३ मधील निशाणी क.१८ वरील आदेश**
**(CNR NO-MHBI08000861-2023)**
**असदमियॉ शेख वि. रईसोद्दीन इनामदार**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरूस्ती करुन मिळणेसाठी दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये केला आहे. सदर अर्जावरील प्रतिवादी यांचे सदर अर्जावरील म्हणणे वाचले. प्रकरणात दाखल सर्व कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

२. वादीतर्फे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, प्रतिवादी नं. ३ व ४ या नावाचे कोणीही व्यक्ती पात्रुड या गावात राहत नाही असा बेलीफ अहवाल आहे. तसेच प्रतिवादी नं. ३ व ४ हे गावातच राहत असून केवळ त्यांचे टोपन नाव दाव्यात नमूद केल्यामुळे व तसे करण्याचे कारण म्हणजे सर्व गावातील लोक प्रतिवादींना टोपन नावानचे ओळखत होते म्हणून तसे नाव दाव्यात नमूद करण्यात आले आहे. तसेच पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना माहीत होते की, बेलिफने आणलेले दाव्यातील समन्स हे त्यांचेच आहेत परंतु जाणिवपुर्वक दावा प्रलंबीत राहून वादीस रिलीफ मिळवण्यास विलंब व्हावा म्हणून केवळ तांत्रिक मुद्याचा गैरवापर करून प्रतिवादी क्र. ३ व ४ हे त्यांचे नाव नाही म्हणून समन्स घेण्यास टाळाटाळ करीत आहेत.

३. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी नं. ३ व ४ यांचे वास्तविक नावाचा शोध घेतला असता मुळ दाव्याच्या पान नं.१ वरील प्रतिवादी क्र.३ चे **आयाज उर्फ आय्या** हे नाव वगळून **इमरान** व प्रतिवादी नं.४ चे **प्यारेबी** हे नाव वगळून **जिलानी बेगम** अशी दुरूस्ती करावी. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असल्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नसल्याने व त्याचा

कोणताही अनिष्ट परिणाम दाव्यातील प्रतिवादींना होणार नसल्याने सदरची दुरुस्ती मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. सदरचे अर्जास प्रतिवादीने आक्षेप घेवून कथन केले की, वादीने हेतुपुरःस्सर प्रतिवादीचे नाव चुकीचे दर्शवून प्रतिवादी क्र.१ याला कोर्टाचे तारखा करण्याच्या उद्येशाने शारिरीक व मानसिक त्रास दिलेला असुन जास्तीत जास्त खर्च लावून नामंजूर करण्याची विनंती केली.

५. अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता वादी मागत असलेली दुरुस्ती ही प्रतिवादी क्र.३ व प्रतिवादी क्र.४ यांचे नावामधील दुरूस्ती असून वादी मागत असलेली दुरूस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असुन त्यामुळे सदर दाव्याचे स्वरुप बदलत नाही. तथा त्याचा परिणाम प्रतिवादीस होणार नाही. त्यामुळे वादी मागत असलेली दुरुस्ती अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणार आहे अशा निष्कर्षाप्रत मी आलो आहे. परंतू सदर दुरुस्तीमुळे प्रकरणास झालेला विलंब व प्रतिवादीस झालेल्या त्रासाबाबत प्रतिवादीस खर्च देवून वादीचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल असे वाटते.

६. या सर्व कारणांचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

१) वादींचा (नि.क्र.१८) चा अर्ज रक्कम रु.३००/- इतक्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२) वादीना असे आदेशित करणेत येते की, त्यांनी सदर अर्जाचे खर्चाची रक्कम रु.३००/- ही तालुका विधी सेवासंघ, माजलगांव यांना देण्यात यावी.

३) वादीनी विहीत मुदतीत दावा दुरुस्ती करुन त्याची प्रत देण्याची आहे.

( खुले न्यायालयात अधिघोषित)

Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2025.01.31 17:13:04 +0530

माजलगाव.
दिनांक : २९/०१/२०२५

(आर.बी.पोळ)
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
माजलगाव.